# महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद

(औषध व्यवसाय अधिनियम १९४८ च्या अंतर्गत घटित)

**४था मजला ,आर स्क्वेअर,** राज्य कामगार विमा योजना रुग्णालयासमोर,

लाल बहादूर शास्त्री मार्ग ,मुलुंड प. मुंबई-४०००८०

दूरध्वनी क्र. २५६८४२९१ ,फॅक्स २५६८४४१८ ईमेल - mspcindia@gmail.com वेबसाईट - www.mspcindia.org

## महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेची निवडणुक

## मतदार यादीच्या विक्रीबाबत सूचना

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद नियम १९६९च्या नियम ४(४) नुसार मतदार यादीची किंमत निश्चित करण्यात आली आहे.

मतदार यादीची छापील प्रत खरेदी करू इच्छिणाऱ्यास कळविण्यात येते की सदर छापील प्रतीची (सहा खंड) किंमत रु. ६०००/- (रुपये सहा हजार मात्र) इतकी निश्चित करण्यात आली असून परिषदेच्या उपरोक्त पत्त्यावरील कार्यालयात उपलब्ध आहे.

तसेच सर्व संबंधितांच्या सोयीसाठी , मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद, मुंबई यांच्या सूचनेनुसार सदर मतदार यादीची सीडी स्वरुपातील प्रतही उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदर सीडीची किंमत रु. १५००/- (रुपये एक हजार पाचशे मात्र) निश्चित करण्यात आली आहे.

मतदार यादीची सीडी अथवा छापील प्रत खरेदी करू इच्छिणाऱ्यांनी परिषद कार्यालयात स्वत: उपस्थित राहून खरेदी केलेली सीडी अथवा छापील प्रत प्रसिध्द केलेल्या प्रतीशी पडताळून पहावी व त्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही करावी. याकरीता परिषद कार्यालयातील सौ. बापट यांचेशी संपर्क साधावा.

हुकुमावरून

सही/-XXX

निबंधक

महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद

दिनांक : १३ सप्टेंबर २०१९